वाचले क्र.

१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक सार्वसु-१०२४/ प्र.क्र.३३/जपुक (२९) दिनांक ०३ एप्रिल, २०२४.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/१८/कावि/ ४९१/२०२४
दिनांक २३/०४/२०२४

**विषय : - सार्वत्रिक लोकसभा निवडणुक - २०२४ च्या अनुषंगाने सार्वजनिक सुट्टी जाहीर करणेबाबत**

आदेश,

महाराष्ट्र शासनाने उपरोक्त वाचले क्र. १ चे अधिसूचनेनुसार सार्वत्रिक लोकसभा निवडणुक – २०२४ च्या अनुषंगाने संबंधित लोकसभा मतदारसंघात ज्या दिवशी मतदान आहे. त्या दिवशी त्या लोकसभा मतदारसंघात सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे क्षेत्र ३३, मावळ व ३६, शिरुर या लोकसभा मतदारसंघात येत आहे. या दोन्ही लोकसभा मतदार संघातील सार्वत्रिक निवडणुक सोमवार, दिनांक १३ मे, २०२४ रोजी असल्याने उक्त अधिसूचनेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील निवडणुक कामकाजासाठी नियुक्त केलेले कर्मचारी व अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी यांना वगळून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना (जे कर्मचारी ३३, मावळ व ३६, शिरुर लोकसभा मतदारसंघ क्षेत्रातील आहेत त्यांना) सोमवार दिनांक १३ मे २०२४ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येत आहे. तसेच अत्यावश्यक सेवेतील कर्मचा-यांना मतदान करता यावे यासाठी विभागप्रमुख / शाखाप्रमुख यांनी योग्य ते नियोजन करुन त्यांना वेळेत सवलत द्यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील जे कर्मचारी हे ३३, मावळ व ३६, शिरुर लोकसभा मतदार संघाव्यतिरिक्त अन्य लोकसभा मतदार संघातील आहेत. त्यांना संबंधित लोकसभा मतदार संघातील निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी लागू राहिल.

सही।–
(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति,

सर्व संबंधित विभाग प्रमुख/शाखाप्रमुख
२/- सदरचा आदेश आपले नियंत्रणाखालील सर्व कर्मचा-यांचे निदर्शनास आणून द्यावा.

प्रत :-

निवडणुक विभाग

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका